# प्रयास

**दंडे प्लॉटस्, राजापेठ, बोंडे हॉस्पिटल जवळ, अमरावती** 444 605

फोन : 0721-2573256, मो. 8275329553

इमेल : sevankur@gmail.com website: www.prayas-sevankur.org


---

## प्रयास इंटर्नशिप कार्यक्रम २०१२- माहितीपत्रक

**प्रयास**, अमरावती ही संस्था १९९४ पासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. मुख्यत्वे आरोग्य, शिक्षण, बालक, युवकांसाठी विविध प्रकल्प राबविण्यात येतात. महाराष्ट्रातील अनेक व्यक्ती व संस्था-संघटनांसोबत संपर्क व नेटवर्किंगद्वारे समाजकार्याच्या बहुतेक सर्वच क्षेत्रांशी **प्रयास** चा जवळचा संबंध आहे.

सेवांकुर या खुल्या मंचाद्वारा महाराष्ट्रभरात युवकांना प्रेरणा देण्याचे काम प्रयास करत आहे. युवकांना विविध क्षेत्रातील आयडॉल्स्चा परिचय व्हावा, त्यांना स्वत:च्या क्षमतांचा विकास करता यावा, विविध कौशल्ये शिकता यावीत, स्वत:सोबतच इतरांच्याही आयुष्यात काहीतरी सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी तयार व्हावे यासाठी विविध प्रकारची शिबिरे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात.

यावर्षी युवक-युवतींसाठी दिवाळीच्या सुट्यांमध्ये अशाच प्रकारचा एक प्रशिक्षण कार्यक्रम अमरावती येथे दि. ५ ते २० नोव्हे. दरम्यान इंटर्नशिपच्या रूपाने आयोजित करण्यात आलेला आहे.

प्रत्यक्ष कामाच्या माध्यमातून आवश्यक त्या व्यावसायिक कौशल्यांचा व योग्य अभिवृत्तीचा विकास होण्यासोबतच, आवश्यक ते नैतिक व सामाजिक मूल्य बिंबविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाची रचना करण्यात आलेली आहे. या माध्यमातून समाजकार्याच्या विविध क्षेत्रांची तोंडओळख व्हावी, स्वत: प्रत्यक्षात कुठल्यातरी एखाद्या सामाजिक सेवाकार्याचा अनुभव घ्यावा व सुटी काहीतरी नविन शिकण्यासाठी कारणी लावावी यासाठी हा उपक्रम आहे.

हा **इंटर्नशीप कार्यक्रम** १५ दिवस कालावधीचा असून यामध्ये काही मार्गदर्शनपर सत्रे पण होतील. मुख्य भर प्रत्यक्ष क्षेत्रकामावर राहील. नेतृत्व कौशल्य, निधी उभारणे, जनसंपर्क, सुसंवाद कौशल्य, नोंदी, अहवाल लेखन, सोशल नेटवर्कींग इ. कौशल्यांचा विकास यामधून आपोआपच होईल. त्यासाठी दररोज किमान ८ से १० तास काम करण्याची तयारी लागेल. तरी इच्छूक युवक-युवतींनी सोबत जोडलेल्या नमुन्यात अर्ज करावा.

### सूचना

१. हा कार्यक्रम १८ ते ३० वर्षे या वयोगटातील तरुण-तरूणींसाठी आहे. ज्यांची मेहनत घेण्याची तयारी आहे व ज्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकायचे आहे वा स्वत:ला नोकरी /व्यवसायासाठी तयार करायचे आहे त्यांच्यासाठी आहे.

२. इंटर्नशिपचा कालावधी १५ दिवस असेल. प्रथम बॅच दि .५ नोव्हे. पासून सुरु होणार. त्यानंतरही नियमित स्वरूपात हा कार्यक्रम वर्षभर राबविण्यात येणार आहे.

३. नोंदणी अर्ज पूर्ण करून लगेच पाठवावा व ङ्काेनवर मुलाखत घेवून निवड करण्यात येईल. दि. ५ नोव्हे.ला सकाळी अमरावतीला पोहचावे लागेल.

४. भोजन व निवास व्यवस्था संस्थेद्वारे करण्यात येईल. १५ दिवसांचा भोजन निवास व्यवस्था खर्च साधारणत: १००० रू. प्रशिक्षणार्थींनी द्यावेत अशी अपेक्षा आहे. गरजूंना आवश्यकतेनुसार यामध्ये अंशत:/पूर्णत: सवलत उपलब्ध असेल.

५. साधारणपणे रोज ८ ते १० तास काम करणे अपेक्षित असेल. त्यापैकी रोज २ तास गटचर्चा, वाचन व व्यक्तिमत्व विकासासाठी राहतील.

६. या कालावधीत प्रत्येक इंटर्नीला एक प्रकल्प निवडून त्यावर काम करावे लागेल. प्रकल्पाची निवड मार्गदर्शकाच्या सल्ल्याने करता येईल. इंटर्नशिप दरम्यान प्रकल्पाचे अपेक्षित उद्दीष्ट साध्य करणे आवश्यक मानले जाईल. शक्यतो कोणतातरी एक सामाजिक गट घेऊन त्यांच्या आयुष्यात काहीतरी बदल घडवून आणणे असे साधारणत:प्रकल्पाचे

स्वरुप असेल. झोपडपट्टी निवासी मुले, स्त्रिया, विधवा, परित्यक्ता, रिक्षावाले, हमाल, मोलकरणी, बालमजूर, कामगार, भिकारी, इ. पैकी एक गट निवडता येईल.

७. त्याशिवाय संस्थेच्या कोणत्यातरी एका उपक्रमाची जबाबदारी घ्यावी लागेल. त्याद्वारे प्रत्यक्ष काम करता करता शिकता येईल.(उदा. स्क्रॅप बँक, अर्न अ‍ॅन्ड लर्न, स्पॉन्सरशिप कार्यक्रम, हृदयसंवाद, सेवांकुर इ.)

**इंटर्नशिपदरम्यान खालील कौशल्ये शिकता यावीत अशा पद्धतीची रचना असेल.**

- आरोग्य व फिटनेस – दररोज व्यायाम, सूर्यनमस्कार व योगा
- विक्री कौशल्य : पुस्तक विक्री व अन्य
- वाचन कौशल्य : या कालावधीत पुस्तके वाचून त्यावर चर्चा, लेखन होईल.
- लेखन कौशल्य : डायरी, अहवाल, केस स्टडी, प्रेस नोट, जाहिरात सामग्री
- हिशोब व अकाऊंटींग कौशल्य : कॅश बुक, लेजर व अन्य
- प्रकल्प तयार करणे, उद्दीष्टे, परिणाम, कार्यक्रम, इंडीकेटर, मॉनिटरींग
- संवाद कौशल्ये – भाषण देता येणे, मिटींग, गटचर्चा, प्रेझेंटेशन कौशल्ये, सोशल नेटवर्कींग
- निधी संकलन – विविध पध्दती
- कॉम्प्युटर कौशल्ये

इंटर्नशिपच्या शेवटी प्रकल्पाची यशस्विता, इंटर्नशिप दरम्यान होणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांमधील उपस्थिती, सहभाग व पुढाकार, सहकाऱ्यांशी व कार्यक्षेत्रातील वर्तन, वेळेची व आर्थिक शिस्त इ. द्वारे उमेदवारांचे मूल्यांकन करण्यात येईल. इंटर्नशिप समाधानकारकरित्या पूर्ण करणाऱ्या यशस्वी उमेदवारांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

===========